आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२५ नोव्हेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- अयोध्येतल्या श्रीराममंदिरात ध्वजारोहण सोहळा प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत संपन्न

- यंदाच्या रब्बी हंगामात या महिन्याच्या २१ तारखेपर्यंत ३ कोटी ६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी

- नवीन कामगार कायद्यांमुळे ७७ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण होऊन बेरोजगारीत १ पूर्णांक ३ दशांश टक्केपर्यंत घट होईल, असा भारतीय स्टेट बँकेचा अंदाज

- इथिओपियातल्या हायली गुब्बी ज्वालामुखीच्या उद्रेकातून तयार झालेल्या राखेच्या ढगामुळे विमानसेवांवर परिणाम

**आणि**

- सुलतान अझलनशहा हॉकी स्पर्धेत बेल्जियमविरुद्धचा सामना भारताने गमावला

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज अयोध्येमधल्या राम मंदिरावर धर्मध्वजारोहण झालं. राममंदिराचं बांधकाम पूर्ण झाल्यानिमित्त हे ध्वजारोहण करण्यात आलं आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**----व्हीसी----**

*(विवाह पंचमीच्या मुहुर्तावर होत असलेल्या धर्मध्वज सोहळ्यानिमित्त देशभरातून हजारो भाविक अयोध्यानगरीत जमले असून सर्वत्र जय श्रीरामचा जयघोष आणि शंखध्वनी ऐकू येत आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी अयोध्येत रोड शो केला आणि राम मंदिर परिसरातल्या विविध मंदिरांना भेट देऊन तिथे पूजा केली. प्रधानमंत्र्यानी सप्तमंदिर, शेषावतार मंदिर तसंच अन्नपूर्णा देवीच्या मंदिराला भेट दिली तसंच रामलल्लाच्या गर्भगृहात पूजा केली. त्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत धर्म ध्वजारोहण झालं. उगवता सूर्य आणि कोविदार वृक्षासह ओम ची प्रतिमा असलेला हा भगवा ध्वज दहा फूट*

*उंच, वीस फूट लांब असून श्रीरामाचं शौर्य आणि अलौकिक तेजाचं प्रतीक मानला जात आहे.)*

**धर्मध्वजारोहणाच्या** या सोहळ्यानिमित्त अयोध्यानगरी आज भारताच्या सांस्कृतिक जाणिवेच्या सर्वोच्च क्षणाची साक्षीदार बनली असून संपूर्ण देश आज राममय झाला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. हा धर्मध्वज भारतीय संस्कृतीच्या पुनर्जागरणाचा ध्वज असून येणाऱ्या पिढ्यांना हा श्रीरामांची शिकवण देत राहील असं प्रधानमंत्री म्हणाले.

- **- होल्ड बाईट मोदी - -**

प्रधानमंत्र्यांनी सर्वांना धर्मध्वज सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या. तसंच अयोध्येतील राम मंदिराच्या निर्माणासाठी ज्यांनी योगदान दिलं त्यांचं अभिनंदन केलं. प्रभु श्रीराम यांनी अयोध्येतून आपल्या जीवनाला सुरुवात केली. सर्वसामान्य माणूस मर्यादा पुरुषोत्तम बनू शकतो हे अयोध्येमुळेच समजलं. आदर्श मूल्यांना आचरणात आणण्याची शिकवण इथूनच मिळते असं प्रधानमंत्री म्हणाले. रामाकडून प्रेरणा घेऊन येणाऱ्या पिढ्यांसाठी देशाचा पाया भक्कम करण्याचा संकल्प यावेळी प्रधानमंत्र्यांनी केला. तसंच मेकॉलेने सुरू केलेल्या शिक्षण व्यवस्थेत येत्या दहा वर्षात आमूलाग्र परिवर्तन घडवण्याचा पुनरूच्चार केला. यावेळी उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ इतर मान्यवर आणि शेकडो भाविकजन उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतीय नौदल आणि तटरक्षक दलाचं प्रत्येक नवीन जहाज पूर्णपणे भारतात तयार होत असून देशाच्या आत्मनिर्भरतेचं प्रतीक असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज समुद्र उत्कर्ष परिसंवादात ते बोलत होते. देशाचा ९५ टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो असं त्यांनी सांगितलं. भारतीय गोद्यांमधे आता बहुउद्देशीय जहाजंही तयार होत आहेत असं सांगून ते म्हणाले की हिंद -प्रशांत महासागर क्षेत्रात जहाजांचा आसरा आणि दुरुस्तीचं केंद्र भारतात व्हावं असं उद्दिष्ट आहे.

- **- - होल्ड - राजनाथ सिंग - -**

- **<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी कुरुक्षेत्र इथं गुरू तेग बहादूर यांच्या साडेतीनशेव्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी ते विशेष नाणं आणि टपाल तिकीटाचं अनावरण करणार आहेत. प्रधानमंत्री भगवान कृष्णाच्या शंखाच्या सन्मानार्थ पांचजन्य इमारतीचं उद्घाटन करणार आहेत. त्यानंतर ते श्रीमद भगवत गीतेच्या उगमाशी संबंधित ब्रह्मसरोवर इथं पूजा करतील.

गुरू तेग बहादूर यांच्या साडेतीनशेव्या जयंतीनिमित्त या वर्षी वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

<><><><><>

यंदाच्या रब्बी हंगामात या महिन्याच्या २१ तारखेपर्यंत ३ कोटी ६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी देशभरात  झाली आहे. सरकारनं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे की सुमारे ७३ लाख हेक्टर क्षेत्रावर कडधान्यांची लागवड करण्यात आली आहे, १९ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात भरड धान्याची तर ७६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर तेलबियांची लागवड झाली असल्याचं कृषी विभागानं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

नवीन कामगार कायद्यांमुळे ७७ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण होऊन बेरोजगारीत १ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांपर्यंत घट होईल, असा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या एका अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबरपासून लागू झालेल्या या कायद्यांमुळं संघटित कामगारांचं प्रमाण किमान १५ टक्क्यांनी वाढून सुमारे साडे ७५ टक्क्यांपर्यंत जाईल. आजघडीला हे प्रमाण ६० पूर्णांक ४ दशांश टक्के असल्याचा अंदाज आहे. सध्या देशभरात असंघटित क्षेत्रातल्या कामगारांची संख्या सुमारे ४४ कोटी इतकी असून त्यापैकी जवळपास ३१ कोटी कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केली आहे. नव्या कामगार कायद्यांमुळे या कामगारांना मिळणारं सामाजिक सुरक्षा कवच पुढच्या २ ते ३ वर्षांमध्ये ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे.

<><><><><>

हमारा संविधान - हमारा स्वाभिमान ही उद्या देशभरात साजऱ्या होणाऱ्या संविधान दिनाची संकल्पना आहे. नवी दिल्लीतल्या संविधान सदनात मुख्य समारंभ होणार असून

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, अनेक केंद्रीय मंत्री आणि खासदार यावेळी उपस्थित राहणार आहेत.

२६ नोव्हेंबरला संविधान दिवस जाहीर करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचं स्मरण केल्याबद्दल संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी प्रसार माध्यमांवरच्या पोस्टमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

<><><><><>

इथिओपियातल्या हायली गुब्बी ज्वालामुखीच्या राखेमुळे मस्कत आणि आसपासचे विमान वाहतूक क्षेत्र प्रभावित झालं असून सर्व भारतीय विमान वाहतूक कंपन्यांनी हे क्षेत्र टाळावं तसंच अशा परिस्थितीत सर्व प्रकारे काटेकोरपणे बाळगावी असा इशारा नागरी हवाई वाहतूक  महासंचालनालयानं दिला आहे. ज्वालामुखीचा उद्रेक किंवा राखेचा ढग यामुळं विमानांसाठी धोका निर्माण होतो, तेव्हा देण्यात येणारा अष्टम हा विशेष संदेशही भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि टूलूस येथील ज्वालामुखी राख सल्लागार केंद्रानं जरी केला आहे.

इथिओपियामधल्या ज्वालामुखीच्या उद्रेकातून वर आलेल्या राखेचे ढग भारतीय आकाशात पोहोचल्यानं बऱ्याच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवा रद्द करण्यात आल्या आहेत.

ही राख भारताकडून चीनच्या दिशेनं सरकत आहे, असं भारतीय हवामानशास्त्र विभागानं म्हटलं आहे. या राखेमुळे विमान वाहतुकीवर परिणाम झाला असला तरी हवामानावर काही विपरीत परिणाम दिसून आलेला नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

मलेशियात इपोह मध्ये सुरु असलेल्या सुलतान अझलान शाह चषक हॉकी सामन्यात बेल्जीयमच्या संघाने भारताचा २ -३ असा पराभव केला. भारताने गेल्या रविवारी तिबार विजेत्या दक्षिण कोरियाचा पराभव केल्यामुळे प्रेक्षकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या. भारताचा पुढला सामना उद्या मलेशियाच्या संघाबरोबर होईल.

//<><><><><>//